सत्यमेव जयते

# महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण

(महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण अधिनियम, २००५ चे कलम ३ अन्वये स्थापित वैधानिक प्राधिकरण)

## Maharashtra Water Resources Regulatory Authority

(A Statutory Authority Established u/s 3 of Maharashtra Water Resources Regulatory Authority Act, 2005)

क्र. मजनिप्रा/२०२१/प्र.मा./गोमपाविम/१३१/२२८ दिनांक : २८/०५/२०२१

प्रति,
कार्यकारी संचालक
गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ,
सिंचन भवन, जालना रोड,
औरंगाबाद-४३१ ००५.

विषय : चिमणपाडा प्रवाही वळण योजना, तालुका दिंडोरी, जिल्हा नाशिक - यांस मजनिप्राची मान्यता मिळणेबाबत.

संदर्भ : का. सं. गोमपाविम, औरंगाबाद पत्र यांचे क्र. गोमपाविम/तां-५/धा. क्र. ०७/ २०२०/१०५२ दि. ०९/०२/२०२१ व पत्र क्र. २२३१ दि. १६/०३/२०२१.

१.० संदर्भीय पत्रान्वये चिमणपाडा प्रवाही वळण योजना, तालुका दिंडोरी, जिल्हा नाशिक या प्रकल्पाच्या मुळ प्रमा प्रस्तावास मजनिप्रा अधिनियम २००५ च्या कलम ११(च) अन्वये मान्यता मिळणेबाबतचा प्रस्ताव प्राप्त झाला आहे. विषयांकित प्रस्तावानुसार दमनगंगा उपखोऱ्यातील ०.८२९ दलघमी (२९.२९ दलघफु) पाणी गोदावरी खोऱ्यामधील कादवा नदीवरील करंजवण धरणाच्या पाणलोट क्षेत्रात वळविण्याचे प्रस्तावित असून त्याद्वारे करंजवण धरणाचे १४४ हेक्टर सिंचन क्षेत्र पुर्नस्थापित करण्याचे प्रस्तावित आहे.

२.० प्राधिकरणाने एप्रिल २०१५ मध्ये प्रकल्पांना मान्यता देण्याचे धोरण अंतिम केले आहे. सदर धोरणानुसार २५० हेक्टर (CCA) वरील सर्व सिंचन प्रकल्प तसेच ज्यांची

साठवण क्षमता १.५० दलघमी पेक्षा जास्त आहे अशा सर्व प्रकल्पांना मजनिप्रा अधिनियम २००५ अन्वये प्राधिकरणाची मान्यता घेणे आवश्यक आहे.

३.० विषयांकित प्रकल्पाचे सिंचन क्षेत्र (CCA) १४४ हेक्टर असून साठवण क्षमता ०.४७५ दलघमी (१६.७९ दलघफु) आहे. सबब, विषयांकित प्रस्ताव परत पाठविण्यात येत आहे.

(रो. सु. सोडळ)
उपसंचालक (नि)

प्रत

१) प्रधान सचिव (जसंप्र व वि), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मादाम कामा रोड मुंबई - ४०००३२.

२) मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग, उत्तर महाराष्ट्र प्रदेश, सिंचन भवन, त्र्यंबक रोड, नाशिक-४२२००२.

३) अधीक्षक अभियंता व प्रशासक, लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, सिंचन भवन, नगर औरंगाबाद रोड, अहमदनगर - ४१४ ००१.